# प्रेसनोट

**भोसरी पोलीस ठाणे हद्दितील सराईत गुन्हेगार नामे, ज्ञानेश्वर ऊर्फ ज्ञान्या रामदास लांडगे याचे टोळीवर मोका अन्वये दाखल गुन्हयाचे दोषारोपपत्र दाखल करण्याची मंजूरी आदेश तसेच कुप्रसिध्द गुन्हेगार नामे, अक्षय दिलीप भोसले, यास स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले बाबत.**

श्री. रामचंद्र जाधव, सहायक पोलीस आयुक्त, चाकण विभाग अति. कार्य. पिंपरी विभाग यांनी श्रीमती. स्मिता पाटील, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ यांचे मार्फतीने एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे गु.रजि.नं. ४३/२०२० भा.द.वि. कलम ३९४, ३९७, ३२३, ५०४, ५०६ आर्म ॲक्ट ३(२५)(२७), ४(२५) म.पो.का.क. ३७(१) (३) सह १३५ व महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(४) चे तपासामध्ये आरोपी नामे, **(१)** ज्ञानेश्वर रामदास लांडगे, वय-२७ वर्षे, रा. गवळी माथा, भोसरी, पुणे, **(२)** गणेश तिम्मा धोत्रे, वय-२७ वर्षे रा. श्रीकृष्ण मंदिराशेजारी, गवळीमाथा, टेल्कोरोड, भोसरी, पुणे, **(३)** मल्लेश चन्नेश कोळवी, वय-२१ वर्षे रा. एकता हौसिंग सोसायटी, चाळ नं.१, माणिक भजुलकर यांचे खोलीत, टॉवर लाईन, चिखली, पुणे, व **(४)** कृष्णा विक्रम शिंदे, वय-२८ वर्षे रा. आदिनाथनगर, भोसरी, पुणे, यांनी स्वतःचे वर्चस्वासाठी व आर्थिक फायद्यासाठी टोळी बनवून संघटितपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्ह्याचा तपास पूर्ण करून सदर टोळी विरूध्द दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करणेपूर्वी मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांचेकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव मंजूर करून मा. पोलीस आयुक्त सो. यांनी दिनांक २०/०७/२०२० रोजी सदर गुन्हेगारी टोळीविरूध्द मोका कायद्यान्वये दोषारोपपत्र दाखल करणे संबंधी आदेश पारीत केलेले आहेत.

तसेच कुप्रसिध्द गुन्हेगार नामे, अक्षय दिलीप भोसले, वय-२२ वर्षे, रा. पापडगल्ली, पवनानगर, काळेवाडी, पुणे, याने वाकड व पिंपरी पोलीस ठाणेचे हद्दित सन २०१६ पासून आत्तापर्यंत ०५ गंभीर गुन्हे केलेले आहेत. त्याच्या गुन्हयांचा चढता आलेख पाहून तसेच मा. पोलीस आयुक्त सो. यांचे आदेशा नुसार व.पो.नि. श्री. विवेक मुगळीकर, वाकड पोलीस ठाणे यांनी त्याचेवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कारवाई करणे कामी प्रस्ताव योग्य मार्फतीने मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांचेकडे सादर केला होता. मा. अपर पोलीस आयुक्त सो. व मा. पोलीस उप-आयुक्त सो. गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा यांनी सदर प्रस्तावातील कागदपत्रांची तसेच गुन्ह्यातील समाविष्ट कागदपत्रांची छाननी करून त्रुटीविरहित प्रस्ताव मा. पोलीस आयुक्त सो. यांना सादर केला असता मा. श्री. संदीप बिष्णोई, सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी दिनांक १६/०७/२०२० रोजी कुप्रसिध्द गुन्हेगार नामे, अक्षय दिलीप भोसले, यास एम.पी.डी.ए. कायद्याखाली स्थानबध्द करण्याचे आदेश दिल्याने त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा, पुणे, येथे स्थानबध्द् करण्यात आले आहे.